Historicity Research Journal
Volume 2 | Issue 4 | Dec 2015
Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# चलेजाव चळवळीत खानदेशातील भुसावळ तालुक्याचे योगदान

**के. डी. ढेकणे[1] , प्रेमनाथ नानाजी भोसले[2]**

[1]इतिहास विभाग प्रमुख व मार्गदर्शक, नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव .
[2]एम. फिल. संशोधक विद्यार्थी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

## प्रास्तविक :-

प्रस्तुत शोध निबंधात खानदेशातील भुसावळ तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी 1942 च्या चले जाव चळवळीत केलेल्या कामगिरीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. भुसावळ येथील यशवंत जयराम फालक यांनी 1942 च्या `चले जाव चळवळीत गावोगावी प्रभात, प्रचार फेऱ्यात सहभाग नोंदविला होता. त्यांना धुळे कारागृहात सहा महिन्यांची शिक्षा भोगावी लागली होती.`

1942 च्या लढयात श्री पांडुरंग रावजी कोल्हटकर रा. बोदवड यांनी चाळीसगाव तालुक्यात वडाळे-वडाळी या गावाजवळ रेल्वे उडविण्याच्या कटात सहभाग नोंदविल्यामुळे पोलिसांनी त्याना 6 वर्षाची शिक्षा दिलेली दिसून येते.[1] 1918 साली जन्मलेले पाटील माधवराव धनजी बोदवड यांनी 1942 च्या चले जाव चळवळीत भूमिगत राहून कार्य केले होते. त्याबद्दल त्यांना सात वर्षे सक्त मजुरीची शिक्षा नमुद केलेली दिसून येते. फुलगाव येथील कोल्हे रामा यांनी चलेजाव चळवळीत सभा, मिरवणुकीत, खादी ग्रामोद्योग या विधायक कार्यात सहभाग नोंदविला होता. तसेच गुप्त वाङ्मयाचे प्रसार कार्यात भाग घेतलेला दिसून येतो. श्री. कोल्हे वना रामचंद्र रा. फुलगाव यांनी सन 1942 च्या चलेजाव चळवळीत सहभाग नोंदविलेला होता. त्यांना नऊ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.

सन 1920 साली जन्मलेले श्री चौधरी नथू तोताराम रा. फुलगाव यांनी 1942 च्या लढयात अस्पृश्यता निवारण्याच्या विधायक कार्यात व सभा मिरवणुकीत भाग घेतलेला होता. त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली होती.[2] फुलगाव येथील बळीराम नारायण यांनी चलेजाव आंदोलनात खेड्यापाड्यातून प्रभाग फेऱ्या, घोषणा, सभा घेणे इत्यादी कामे त्यांनी केलेली दिसून येते. तसेच त्यांना धुळे कारागृहात सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. श्री चौधरी मधुकर अमृता रा. फुलगाव यांनी 1942 च्या चले जाव चळवळीत सभा, मिरवणुकीत सहभाग नोंदविल्याबद्दल त्यांना जळगाव न्यायालयात त्यांच्यावर खटला भरविण्यात आलेला दिसून येतो. फुलगाव येथील चौधरी रामचंद्र यांनी 1942 च्या चले जाव चळवळीत सहभाग घेतल्याने सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झालेली दिसून येते.[3] तसेच वरणगावचे दत्तात्रय जोशी यांनी 15 जुलै पासुन तळवेल व फुलगाव सारख्या लहान गावामध्ये युध्द-विरोधी भाषणे करून जनतेमध्ये जनजागृती करण्याचे कार्य केलेले दिसून येते. सन 1920 मध्ये जन्मलेले श्री नारायण शंकर दुबे भुसावळ 1942 च्या चले जाव चळवळीत भूमिगत राहून रेल्वे मार्ग उडवण्याच्या कटात सामील झाले होते. त्यांना पुण्याच्या न्यायाधीशंनी चार महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा केल्याची नोंद दिसून येते.

श्रीमती देवधर चिंधुबाई केशवराव रा. भुसावळ यांनी 1942 च्या लढ्यात सहभाग नोंदविल्यामुळे त्यांना 1 वर्ष नागपुर जेलमध्ये शिक्षा भोगावी लागली होती. तळवेल येथील पाटील अंकात रावजी यांनी चलेजावच्या चळवळीत सभा, मिरवणुकीत सहभाग घेतला होता. त्यांना सहा महीने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.[4] इ. स. 1915 साली जन्मलेले श्री पंडित सिताराम पाटील तळवेल यांनी

1942 च्या लढ्यात गावात, सभा मिरवणुका घेतल्याने त्यांना धुळे येथील कारागृहात 6 महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा झालेली दिसून येते. कुऱ्हे येथील श्री पाटील त्रिविक्रम यांनी चलेजाव चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यात भाग घेतला होता. त्यांना काही महीने भुसावळ येथून हद्दपार केल्याची नोंद दिसून येते. श्री. मार्तंड रूपला पाटील खंडाळे यांनी 1942 च्या चलेजाव चळवळीत भूमिगत आंदोलनात रेल्वे लाईनच्या मोडतोडीला सहभाग नोंदविला होता.[5] 1942 च्या लढ्या पाटील रामकृष्ण विष्णू पिंप्रीसेकम यांनी भूमिगत आंदोलनाच्या कार्यात भाग घेतला होता. तसेच गुप्त वाङ्मयाचा प्रसार केलेला दिसून येतो. भुसावळ येथील श्री. दत्तोबा वासुदेव दास्ताने 1942 च्या चळवळीत सभा, मिरवणुका सहभाग घेतलेला दिसून येतो तसेच ते 1 वर्ष 4 महिने स्थानबद्ध होते.[6]

इ. स. 1909 मध्ये जन्मलेले वाघ पंढरीनाथ रानुजी मजुर यांनी 1942 च्या लढ्यात भाग घेतल्याने 9 महिने सक्त मजुरीची शिक्षा झालेली दिसून येते. मनुर बुद्रुक येथील श्री गावंडे काशिनाथ 1942 सालच्या लढ्यात जनजागृती करीत असतांना 6 महिने सक्त मजुरीची शिक्षा भुसावळ येथे झाल्याची नोंद दिसून येते. श्री भोळे चावदस बनाजी सुनसगाव यांनी चलेजाव चळवळीत मिरवणुकीत सहभाग घेतल्याने त्यांना 1942 मध्ये डिरेक्शन मध्ये 14 महिने ठेवण्यात आले होते. 1907 साली जन्मलेले भोळे हेमराज दगडू तथा वैद्या चिंतामण भोजू हे 1942 सालच्या चले जाव चळवळीत भूमिगत आंदोलनाच्या कार्यात भाग घेतला होता.[7] तसेच त्यांना भुसावळच्या न्यायालयात एक वर्ष सक्त मजूरीची शिक्षा व दोनशे रूपये दंडाची शिक्षा झाल्याची नोंद दिसून येते. वराडसीम येथील श्री वाणी भाडू जाधव यांनी 1942 च्या चलेजाव आंदोलनात भाग घेतल्याने 15 दिवस जळगाव सबजेल मध्ये बंदिस्त करण्यात आले होते. तसेच ठाणे जेलमध्ये डेटीन्यू म्हणून 1 वर्ष ठेवण्यात आले होते.

श्री पाटील रामा फुलगाव यांनी 1942 च्या चळवळीत सभा मिरवणुकीत सहभाग घेतलेला दिसून येतो. तसेच गुप्त वाङ्मयाचा प्रसार देखील केलेला दिसून येतो. इ. स. 1924 साली जन्मलेले श्री पाटील श्रावण गंभीर यांनी 1942 च्या चलेजाव आंदोलनात सभा मिरवणुकीत सहभाग घेतलेला दिसून येतो. तसेच त्यांना धरणगावच्या न्यायालयात सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागल्याची नोंद दिसून येते.

अशा प्रकारे भुसावळ तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी चलेजाव चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग दिल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची :**

1) लेले केशव गोविंदा - स्वातंत्र्य लढ्यातील आमचा सहभाग, पृ. 35
2) डॉ. कुंटे भ. ग. - स्वातंत्र्य सैनिक चारित्र्य कोश, पृ. 265
3) चौधरी के. के. - जळगाव जिल्हा गॅझेटीअर, पृ. 140
4) लोखंडे इंदिरा अशोक - भारतीय स्वातंत्र्य चळवळीत खानदेशातील स्त्रियांचा सहभाग : एक ऐतिहासिक अभ्यास (1920-1947)
5) डॉ. कुंटे भ. ग. - स्वातंत्र्य सैनिक चारित्र्य कोश, पृ. 258
6) डॉ. ढेकणे के. डी. - महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी, पृ. 122
7) भोगे वैद्यराज - जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढयाचा गत इतिहासाचे सिंहावलोकन, पृ. 65